महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर,कोल्हापूर - ४१६ ००४.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

दुरध्वनी क्र - ०२३१ - २६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in
Email Id- divsec.kop@gmail.com

**महत्वाचे / परीक्षा प्राधान्य**

क्र.कोविमं/ माध्य.गोप /उ.प.तपासणी/ 1803.
दिनांक : 0६.१0.२0२३

प्रति,
मुख्याध्यापक,
मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
जिल्हा सातारा ,सांगली,कोल्हापूर

**विषय** : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र [ इयत्ता १० वी ] परीक्षा मार्च २०२४ च्या परीक्षेस परीक्षक / नियामक नेमणुक तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती पाठविणेबाबत

**संदर्भ** : या कार्यालयाचे पत्र क्र.कोविमं/१० वी गोपनीय/पॅनेल २०२२-२४/ दिनांक २८.१०.२०२१ चे पत्र पहावे.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन माध्यामिक शालांत प्रमाणपत्र [ इयत्ता १० वी ] मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षेसाठी उत्तरपत्रिकांची तपासणी कामासाठी परीक्षक / नियामक नेमणूकीच्या अनुषंगाने आपणाकडून उपरोक्त संदर्भ पत्रान्वये प्राप्त झालेल्या शिक्षक माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली अद्ययावत शिक्षक माहिती /यादी या पत्रासोबत **दिनांक 13/10/2023 रोजी वितरण केंद्रावर हस्तपोच** आपणास देण्यात येत आहे. त्यातील माहितीची पडताळणी करण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना खालीलप्रमाणे

1. **महत्वाचे :आपल्या शाळेकडे कार्यरत असलेल्या सर्व शिक्षकांची नांवे सोबतच्या यादीत समाविष्ठ असणे आवश्यक असल्याने यासंदर्भात शाळाप्रमुख म्हणून सर्वस्वी मुख्याध्यापक जबाबदार रहातील**. यादीमध्ये नांवे नसल्यास संपूर्ण नावांसह शिकवीत असलेला विषय,माध्यम, परीक्षक/नियामक टर्न, सेवानिवृत्ती दिनांक व मोबाईल नंबर इ. माहिती नोंदवून नावांसमोर संबंधितांची स्वाक्षरी घ्यावी.
2. यादीतील शिक्षकांची आपल्या शाळेतून अन्य शाळेत बदली झाली असेल अथवा अन्य शाळेतून बदलीने आपल्या शाळेत नियुक्ती झालेल्या शिक्षकांच्या नावासमोर संपूर्ण तपशीलासह **लाल शाईच्या पेनने** नोंदी कराव्यात.
3. यादीतील शिक्षकांचे संपूर्ण नांव [ इंग्रजी स्पेलींगसह] त्याचबरोबर शिकवीत असलेल विषय आणि माध्यम, इ. सर्व माहिती बरोबर आहे का ? याची खात्री करावी.
4. एखादा शिक्षक एका पेक्षा अधिक विषय शिकवीत असेल तर तशी स्वतंत्र नोंद करावी.[ **प्रामुख्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील गणित आणि विज्ञान विषयाच्या शिक्षकांना ऐनवेळी गरज भासल्यास दोन्ही विषयासाठी नेमणूक देण्यात येईल ] त्याचबरोबर गणित व विज्ञान या विषयाच्या सेमी माध्यमाच्या उत्तरपत्रिका आवशक्यतेनुसार मराठी माध्यमाच्या शिक्षकांना मूल्यमापनासाठी देण्यात येतील**.

5. जून २०२४ पूर्वी सेवानिवृत्ती होणारे विषय शिकवीत नसलेले तसेच अभ्यासमंडळ सदस्य , कॅन्सर/ हदयरोगी / टी.बी. अशा आजाराने पिडीत असलेल्या शिक्षकांच्या नोंदी ठळकपणे करणे आणि त्यासंदर्भात आवश्यक पुरावा जोडणे अनिवार्य आहे.

6. यापूर्वी प्रमुख नियामक [ C.M.] म्हणून काम केलेल्या शिक्षकांनी त्यांची परीक्षक म्हणून काम करण्याची तयारी असेल तर तसे त्यांच्या नावासमोर नोंद करावी. त्याचबरोबर एखाद्या शिक्षकांवर मंडळाकडून प्रतिबंधात्मक कारवाई केली गेली असल्यास तसा त्यांच्या नावांसमोर उल्लेख करण्यात यावा.

7. **मुख्याध्यापक,उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक, उपकेंद्रसंचालक** हे प्रशासकीय कारणाने उत्तरपत्रिका तपासणीस नकार देतात. तथापि उत्तरपत्रिका तपासणीसाठी उपलब्ध शिक्षकांची संख्या विचारात घेता तसेच निकालाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण होणेच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार या सर्वांना परीक्षन/नियमनाचे काम करणे बंधनकारक राहिल

8. **महत्वाचे : प्रामुख्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळांबाबत असे दिसून येते की, उत्तरपत्रिकांचे गठठे तपासणीसाठी या शाळांकडे प्राप्त झाल्यानंतर ऐनवेळी संबंधित शिक्षक शाळा सोडून गेल्याचे सांगतात. ही बाब अत्यंत गभीर असून अशावेळी उत्तरपत्रिका तपासून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी मुख्याध्यापकांची राहील याची नोंद घ्यावी.**

9. **महाराष्ट्र खाजगी शाळा सेवा शर्ती १९८१ नियम २२[ १ ]अनूसूची [ अ] मधील ४ [ १८,१९] नुसार सर्व शिक्षकांना मंडळाच्या परीक्षा अनुषंगिक सर्व कामे अनिवार्य आणि बंधनकारक आहे. तसेच जाणीव पूर्वक शिक्षक माहिती न पाठविणे / उत्तरपत्रिका गठठा न तपासणे/परत पाठविणे/ अपूर्ण माहिती पाठविणे अशा सर्व घटनांबाबत सर्वस्वी जबाबदारी शाळाप्रमुख या नात्याने मुख्याध्यापकांवर राहिल.**

**शास्त्र व तंत्र प्रात्यक्षिक परीक्षेसंदर्भात शिक्षक माहिती**

इयत्ता १० वी ची लेखी परीक्षा मार्च २०२४ महिन्यात घेण्याचे निश्चीत केलेले आहे.तत्पूर्वी प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन करणेच्या दृष्टीने **शास्त्र व तंत्र प्रात्यक्षिक** विषय शिक्षकांची माहिती तथा स्वीकृती पत्र या सोबत पाठविण्यात येत आहे. सदरहू माहिती परीपूर्ण भरुन घेवून संबंधितांच्या स्वाक्षरीसह **परीक्षक/नियामक यादीसोबत** या कार्यालयाकडे सादर करावयाची आहे.

वरील सर्व सूचना तथा माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे त्यांच्या नावांसमोर स्वाक्षरी घेण्यात यावी.**वरीलप्रमाणे शिक्षकांची परीपूर्ण माहिती / स्वीकृती पत्रे कोणत्याही परिस्थितीत शुक्रवार दि. 27/10/2023 आपल्या वितरण केंद्रावर जमा करावयाची आहे.** उशिरा सादर केल्या जाणा-या माहितीसाठी प्रतिदिन दंडात्मक कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी. **काही शाळांचे मुख्याध्यापक काही शिक्षकांची नांवे जाणीवपुर्वक वगळून यादी सादर करत असल्याचे या कार्यालयास निदर्शनास आले आहे. यापुढे कार्यरत शिक्षकांची नांवे वगळल्याचे निदर्शनास आल्यास मुख्याध्यापकांवर म.खा.शा.क. (सेवेच्या शर्ती) नियमावली 1981 मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयी कारवाई प्रस्तावीत केली जाईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

**सोबत:** विहीत शिक्षक माहिती
[लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा ]

[ डी.एस.पोवार ]
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

**सर्व वितरण केंद्रप्रमुख - जमा झालेली स्वीकृती पत्रे तालुकानिहाय मंडळ कार्यालयात सोमवार दिनांक 30/10/2023 रोजी न चुकता जमा करावयाची आहेत.**

D/PATIL 2/MAR 2024/PANEL LETTER FOR MAR 2024